**निशाणी क्र. ६७/ क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक–३ यांची जबानी–**

मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,

**माझे नाव – श्री. रामेश्वर रामदास बुडुखले,**

वय – ४१ वर्षे, व्यवसाय – व्यापार,

निवासस्थान– गजानननगर, गारखेडा परिसर, छ.संभाजीनगर.

---

**सरतपासणी अभियोग पक्षा करीता**

**विद्वान श्री. जे. आय. परकोटे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे द्वारा –**

**१.** सन–२०१४ साली मी जी.टी.एल. कार्यालय, औरंगाबाद येथे ज्युनिअर इंजिनियर म्हणून कार्यरत होतो. फिर्यादी श्री. मनोज वेजारे यांना मी ओळखतो. सर्व आरोपींना मी ओळखत नाही. घटना कधी व कोणत्या व कोठे तारखेला घडली होती हे मला माहीती नाही. पोलीसांना माझ्याकडे चौकशी करून जबाब नोंदविला नाही. दिनांक ०१.०८.२०१४ रोजी सर्व आरोपी आमच्या कार्यालयात आले आणि आमचे सहकारी श्री. नितीन वेजारे यांना शिवीगाळ करून मारहाण केली, असे काही घडले नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षाला मदत करीत नाही, त्यामुळे सहाय्यक सरकारी वकील यांनी विनंतीवरून उलट तपासाचे स्वरुपात सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी दिली.**

**२.** हे म्हणने खरे नाही की, दिनांक ०१.०८.२०१४ रोजी सकाळी ०९.०० वाजता मी आमच्या कार्यालयात ड्युटीसाठी आलो होतो. हे म्हणने खरे नाही की, सर्व आरोपी हे आमच्या कार्यालयात आले आणि ते फिर्यादी श्री. मनोज वेजारे यांना म्हणाले की, तुम्ही शमीम बेग शेख चॉद, वैभव सखा एढके व अक्षय भिमराव पवार यांना नवीन कनेक्शन का देत नाही. हे म्हणने खरे नाही की, फिर्यादी श्री. मनोज हे आरोपींना म्हणाले की, शमीम बेग, वैभव एढके आणि अक्षय पवार यांच्याकडे मागील थकबाकी असल्याने त्यांना नवीन कनेक्शन देता येत असे बोलले. हे म्हणने खरे नाही की, त्यानंतर आरोपी संदीप बोरगे याने श्री. नितीन महाजन यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली व फिर्यादी श्री. मनोज वेजरे यांना शिवीगाळ केली.

**३.** मला आता माझ्या जबाबामधील **अधोरेखांकित भाग–अ** वाचुन दाखविला. हे म्हणने खरे नाही की, हा अधोरेखाकिंत भाग–अ मजकुर मी पोलीसांना सांगीतला होता. सदरचा मजकुर पोलीसांनी माझ्या जबाबात का लिहला याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणने खरे आहे की,आरोपी हे माझ्या ओळखीचे असल्यामुळे त्यांना वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपासणी आरोपी पक्ष क्र.१ करीता विद्वान श्री. व्ही. के. कांचले विधीज्ञ– यांना उलटतपास नाकारला.**

**उलटतपासणी आरोपी पक्ष क्र.२ करीता विद्वान श्री. पी. पी. कारेगांवकर, विधीज्ञ– यांना उलटतपास नाकारला.**

**उलटतपासणी आरोपी पक्ष क्र.३ करीता स्वतः– उलटतपास नाकारला.**

**फेरतपास– काही नाही.**

समक्ष
–/**स्वाक्षरीत**/–
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
दिनांक– १२/११/२०२५.

श्रवणोत्तर स्वीकृती.
–/**स्वाक्षरीत**/–
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद